मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# भाजपचे रवि लांडगे दुसऱ्यांदा बिनविरोध

## महापालिका निवडणुकीत भाजपने खोलले खाते; फक्त औपचारिकता बाकी

**पिंपरी | प्रतिनीधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या निवडणुकीसाठी मतदान होण्यापूर्वीच भाजपने खाते खोलले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाकडून उमेदवारी जाहीर झालेल्या उमेदवाराने प्रत्यक्षात मनसेकडून अर्ज भरला. तो अर्जही जात प्रमाणपत्रामुळे बाद झाल्याने आणि दोन अपक्षांनी माघार घेतल्याने भोसरीतील प्रभाग क्रमांक सहा मधून भाजपचे रवि लांडगे यांची बिनविरोध निवड निश्चित झाली आहे. २०१७ मध्येही लांडगे यांची बिनविरोध निवड झाली होती.



भाजपचे दिवंगत शहराध्यक्ष अंकुश लांडगे यांचे रवि हे पुतणे आहेत. भाजपचे निष्ठावान अशी लांडगे कुटुंबांची ओळख आहे. भोसरीतील प्रभाग क्रमांक सहा सद्गुरूनगर, चक्रपाणी वसाहत, धावडेवस्ती, भगतवस्ती मधून रवि लांडगे हे २०१७ मध्ये भाजपकडूनच बिनविरोध निवडून आले होते. त्यावेळी तत्कालीन राष्ट्रवादी काँग्रेसने त्यांच्या विरोधात उमेदवार दिला नव्हता. महापालिकेतील भाजपच्या पाच वर्षांच्या सत्ता काळात रवि यांना एकही पद दिले नाही. स्थायी समितीच्या अध्यक्षपदासाठी डावलले. त्यामुळे रवि नाराज होते. नाराज झाल्यानंतर सुरुवातीला ते उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या संपर्कात होते. परंतु, पक्षात प्रवेश केला नाही. भोसरीतून विधानसभा निवडणूक लढविण्यासाठी रवि यांनी शिवसेना (ठाकरे) पक्षात प्रवेश केला. परंतु, महाविकास आघाडीत ही जागा राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाला सुटली. त्यामुळे रवि यांना विधानसभा निवडणूक लढवता आली नाही. त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाच्या अजित गव्हाणे यांचा प्रचार केला. महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर रवि यांनी पुन्हा स्वगृही म्हणजे भाजपमध्ये प्रवेश केला.

भोसरीतील प्रभाग क्रमांक सहा सद्गुरूनगर, चक्रपाणी वसाहत, धावडेवस्ती, भगतवस्ती मधून रवि लांडगे यांना भाजपची उमेदवारी मिळाली. त्यांनी नागरिकांचा मागास प्रवर्ग 'ब' जागेसाठी उमेदवारी अर्ज दाखल केला. त्यांच्याविरोधात राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाने निलेश सुर्यवंशी यांना उमेदवारी जाहीर केली होती. प्रत्यक्षात सुर्यवंशी यांनी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाकडून उमेदवारी अर्जच दाखल केला नाही. त्यांनी मनसेकडून अर्ज दाखल केला. पण, जात प्रमाणपत्रामुळे त्यांचा अर्ज छाननीत अपात्र झाला. रवि लांडगे यांच्या पत्नी श्रद्धा लांडगे आणि प्रसाद ताठे या दोघांनी अपक्ष अर्ज दाखल केला होता. या दोघांनीही छाननीनंतर उमेदवारी अर्ज मागे घेतला. त्यामुळे रवि लांडगे यांची बिनविरोध निवड निश्चित झाली आहे. त्यांच्या निवडीवर १६ जानेवारी रोजी शिक्कामोर्तब होईल.

याबाबत प्रसाद ताठे म्हणाले, माघार घेण्यासाठी माझ्यावर कोणताही दबाव नव्हता. प्रभागाचा विकास साधण्यासाठी आम्ही एकत्र आलो आहे. माझ्या सर्व संकल्पना राबविण्याची हमी रवि लांडगे यांनी दिली आहे. त्यामुळे माघार घेतली आहे.

# पिंपरी चिंचवड महापालिकेच्या स्वीप कार्यक्रमांतर्गत उपक्रमाचे आयोजन

## आकुर्डीतील 'सखी आंगण' येथे स्वीप कार्यक्रमांतर्गत मतदान जनजागृती उपक्रम उत्साहात

**पिंपरी | प्रतिनीधी**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या दिव्यांग भवन फाउंडेशन येथे पथनाट्य सादरीकरण, फ्लॅश मॉब आणि स्वाक्षरी मोहीम राबवत दिव्यांग बांधवांसाठी मतदान जनजागृती उपक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमात दिव्यांग बांधवांसाठी साईन लँग्वेजमध्ये मतदान शपथ घेण्यात आली.

पिंपरी चिंचवड महापालिकेची निवडणूक जाहीर झाली असून, या निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढावी यासाठी महापालिका आयुक्त तथा निवडणूक अधिकारी श्रावण हर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली व अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर, उपायुक्त अण्णा बोदडे यांच्या अधिपत्याखाली राबविण्यात येत असलेल्या स्वीप कार्यक्रमांतर्गत महापालिकेच्या दिव्यांग भवन फाउंडेशन येथे मतदान जनजागृती उपक्रम राबविण्यात आला.

महापालिकेच्या अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर, दिव्यांग भवन फाउंडेशनचे व्यवस्थापकीय संचालक ओमप्रकाश देशमुख यांच्यासह महापालिकेचे उपायुक्त अण्णा बोदडे, ममता शिंदे, दिव्यांग भवनचे मुख्य कार्यकारी अधिकारी परेश गांधी तसेच दिव्यांग बांधव उपस्थित होते.




यावेळी अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर म्हणाल्या, दिव्यांग मतदारांना महापालिकेकडून मतदान केंद्रावर आवश्यक त्या सोयीसुविधा महापालिकेच्या समाज विकास विभागाच्या माध्यमातून उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. पिंपरी चिंचवड महापालिकेची निवडणूक १५ जानेवारी रोजी होत असून, या निवडणुकीच्या अनुषंगाने व्यापक प्रमाणात मतदान जनजागृती करण्यात येत आहे. या अंतर्गत समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत पोहोचण्याचे काम सुरू आहे.

उपायुक्त अण्णा बोदडे म्हणाले की, दिव्यांग बांधवांनी पिंपरी चिंचवड महापालिका निवडणुकीत मतदानाचा हक्क बजावत मतदानाच्या माध्यमातून पर्पल जल्लोष साजरा करावा. भारतीय संविधानाने प्रत्येक व्यक्तीला मतदानाचा अधिकार दिलेला आहे. दिव्यांग बांधवांनी देखील येत्या १५ जानेवारी मतदानाचा हक्क बजावत समाजासमोर एक वेगळा आदर्श ठेवावा, असे देखील ते म्हणाले.

### साईन लँग्वेजमध्ये मतदानाची शपथ..

» आम्ही, भारताचे नागरिक, लोकशाहीवर निष्ठा ठेवून, याद्वारे प्रतिज्ञा करतो की, आपल्या देशाच्या लोकशाही परंपरांचे जतन करू आणि मुक्त, निःपक्षपाती व शांततापूर्ण वातावरणातील निवडणुकांचे पावित्र्य राखू व प्रत्येक निवडणुकीत निर्भयपणे तसेच धर्म, वंश, जात, समाज, भाषा यांच्या विचारांच्या प्रभावाखाली न येता किंवा कोणत्याही प्रलोभनास बळी न पडता मतदान करू, अशी शपथ यावेळी उपस्थितांना देण्यात आली. कार्यक्रमाला उपस्थित असणाऱ्या दिव्यांग बांधवांसाठी साईन लँग्वेजमध्ये देखील या मतदान शपथेचे वाचन करण्यात आले.

# महापालिका निवडणूक : 38 उमेदवारांनी घेतली माघार

## माघारीनंतर 41 उमेदवार रिंगणात; अनेक प्रभागांत थेट तर काही ठिकाणी चुरशीच्या लढती स्पष्ट

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५–२६ च्या पार्श्वभूमीवर उमेदवारी माघारी घेण्याच्या अंतिम दिवशी मोठ्या प्रमाणात हालचाल पाहायला मिळाली. तब्बल ३८ उमेदवारांनी आपले अर्ज मागे घेतले असून, आता निवडणूक रिंगणात एकूण ४१ उमेदवार कायम राहिले आहेत.

माघारीच्या प्रक्रियेमुळे अनेक प्रभागांतील लढतींचे चित्र स्पष्ट झाले असून, काही ठिकाणी थेट तर काही ठिकाणी चुरशीच्या लढती होणार असल्याचे संकेत मिळत आहेत.

क्षेत्रीय कार्यालयनिहाय माघार घेतलेल्या उमेदवारांचा तपशील पुढीलप्रमाणे —

अ क्षेत्रीय कार्यालय : ११ उमेदवारांनी माघार

ब क्षेत्रीय कार्यालय : २ उमेदवारांनी माघार

क क्षेत्रीय कार्यालय : १२ उमेदवारांनी माघार

ड क्षेत्रीय कार्यालय : ८ उमेदवारांनी माघार

इ क्षेत्रीय कार्यालय : ५ उमेदवारांनी माघार

फ क्षेत्रीय कार्यालय : एकही माघार नाही (निरंक)

ग क्षेत्रीय कार्यालय : २ उमेदवारांनी माघार

ह क्षेत्रीय कार्यालय : १ उमेदवाराने माघार

माघारीनंतर आता अनेक प्रभागांत थेट लढती स्पष्ट झाल्या असून, काही ठिकाणी बहुकोनी संघर्ष कायम आहे. त्यामुळे प्रचाराला अधिक वेग येण्याची शक्यता आहे. उमेदवारांकडून प्रचार फेऱ्या, बैठका, गाठीभेटी



आणि मतदारांशी थेट संवाद यावर भर दिला जात आहे.

आता अंतिम उमेदवार निश्चित झाल्याने प्रचाराचा रंग चढणार असून, पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या निवडणुकीत पुढील टप्प्यात राजकीय वातावरण अधिक तापणार हे निश्चित आहे.

नामनिर्देशन मागे घेणाऱ्या उमेदवारांची नावे –

1) अश्विनी निलेश खंडेराव – १० अ
2) रोहिणी प्रसाद रासकर -१० ब
3) भालदार गुलामअली इब्राहिम -१४ अ
4) संगिता खेमराज काळे – १५ ब
5) शुभांगी विलास शिंदे -१५ ब
6) स्मिता जयंत बागल -१५ ब
7) संगिता खेमराज काळे -१५ क
8) स्मिता जयंत बागल -१५ क
9) पूजा राजेंद्र सराफ -१८ ब
10) मनिषा चंद्रहास वाल्हेकर -१७ क
11) जुनेद अहमद चौधरी -२ क
12) खान मोहम्मद अरिफ -२ क
13) लांडगे श्रद्धा रवि – ६ ब
14) ताठे प्रसाद तुकाराम -६ ब
15) पंकज शिवाजी पवार -८ अ
16) वाघमारे राहुल बाबासाहेब -९ अ
17) अँड. दत्ता हरिश्चंद्र झुळूक -९ अ
18) कांबळे उत्तम संभाजी -९ अ
19) शेरखाने अजय देविदास- ९ अ
20) राजेश यशवंतराव नागोसे- ९ ड
21) दिपक राजू म्हेत्रे -९ ड
22) भोसले हनुमंतराव भीमराव -९ ड
23) गायकवाड विनय रमेश -२५ अ
24) मोनिका नितीन दर्शले -२५ ब
25) वाकडकर राम हनुमंत -२५ ड
26) गायकवाड ममता विनय -२६ अ
27) जयनाथ काटे -२८ ड
28) राजू बाबुराव लोखंडे -२९ क
29) रणपिसे मधुकर सोपान – २९ ड
30) जगताप अक्षय किसन -२९ ड
31) भोसले रजनी निखील -३ अ
32) सचिन किसन लांडगे -५ ड
33) शिंदे भरत किसनराव -५ ड
34) लोंढे शुभांगी संतोष -७ अ
35) लोंढे प्रज्वल संतोष -७ अ
36) साठे कल्याणी -२१ क
37) बारणे साक्षी तानाजी -२३ ब
38) आढाव आरती निलेश- ३१ अ

# मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या उपस्थितीत 'शक्तीस्थळ'चे लोकार्पण

## आम्ही कायम जगताप कुटुंबियांच्या पाठीशी; मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवडमध्ये आल्यानंतर लोकनेते लक्ष्मणभाऊ जगताप यांची आठवण आल्याशिवाय राहत नाही. त्यांच्या माध्यमातून शहरात झालेल्या चिरस्थायी कार्याची आठवण देणारे, तमाम कार्यकर्त्यांना प्रेरणा देणाऱ्या शक्तीस्थळाचे लोकार्पण आज करण्यात आले. हे शक्तीस्थळ कार्यकर्त्यांना ऊर्जा देणारे ठरेल असे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस गुरुवारी (दि 1) म्हणाले. पिंपरी चिंचवड शहराला विकासाचा ठोस चेहरा देत सामान्य माणसाच्या जीवनात परिवर्तन घडवण्याचे काम त्यांनी केले. औद्योगिकीकरणामुळे वेगाने विस्तारत असलेल्या या शहराला अत्याधुनिकतेकडे नेण्यासाठी लक्ष्मणभाऊंनी राज्य सरकार आणि महापालिकेचा समन्वय साधत विकासाचे दूरदृष्टीपूर्ण व्हिजन प्रत्यक्षात उतरवले. त्यांची कारकीर्द, विकासातील योगदान कायम स्मरणात राहील असेही मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

लोकनेते लक्ष्मणभाऊ जगताप यांच्या स्मरणार्थ त्यांच्या कार्याचा आढावा देणारा आणि कार्यकर्त्यांच्या ऊर्जेचे केंद्र ठरणाऱ्या शक्तीस्थळाचे लोकार्पण पिंपळेगुरव येथे राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी केले त्यावेळी ते बोलत होते.

मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यावेळी म्हणाले,आम्ही कायम जगताप कुटुंबियांच्या पाठीशी ठाम उभे आहोत. यापुढील काळात लक्ष्मणभाऊंनी पाहिलेली स्वप्न पूर्ण करणे ही आपली जबाबदारी आहे. त्यांच्या स्वप्नातील शहर आज पूर्णत्वाला आणले जात आहे. त्यांच्या स्वप्नातील शहराचा विकास आराखडा आपल्याला अस्तित्वात आणायचा आहे. ते केवळ निवडणुका नव्हे तर मन जिंकणारे नेते होते. त्यांच्या आठवणी कायम चिरकाल हृदयात आहेत आजचे हे शक्ती स्थळ त्यांच्या प्रेरणेची ऊर्जा देणारे केंद्र ठरेल. लक्ष्मणभाऊ म्हणजे शेती, मातीतून तयार झालेले नेतृत्व होते. कोणताही मोठा



राजकीय वारसा त्यांच्या जवळ नव्हता. मात्र स्वतःच्या हिमतीवर त्यांनी राजकारणात पाऊल ठेवले आणि मागे वळून कधी पाहिलेच नाही. येथील नदीत नाव उलटण्याचे निमित्त झाले आणि या शहराला सर्वंकष असे नेतृत्व लक्ष्मणभाऊंच्या रूपात मिळाले. असे अपघात पुन्हा आपल्या शहरात व्हायला नको. आपले शहर विकासाच्या वेगाने धावले पाहिजे. हा एकच विश्वास आणि हीच जिद्द काय मनात ठेवून त्यांनी पिंपरी चिंचवड शहरासाठी, शहर अत्याधुनिक करण्यासाठी जे जे हवे ते ते या शहरांमध्ये आणले. युवा अवस्थेत राजकारणात प्रवेश केल्यानंतर ते नगरसेवक म्हणून निवडून आले. तब्बल 21 वर्षे या पदावर कायम राहत केवळ समाजकारण करत राहिले. माणसे जोडत गेले म्हणूनच त्यांनी कधी मागे वळून पाहिले नाही. ते चार वेळा आमदार राहिले. या कालावधीत शहराला विकासाच्या वेगाशी जोडले.

पिंपरी चिंचवड शहराला चेहरा देण्याचे काम लक्ष्मणभाऊंनी केले असे सांगून मुख्यमंत्री म्हणाले, सामान्य माणसाच्या जीवनात परिवर्तन घडवण्याचे काम त्यांच्या माध्यमातून झाले. पिंपरी चिंचवड शहरामध्ये औद्योगिकीकरणाच्या माध्यमातून मोठी प्रगती झाली. अनेक कारखान्यांमुळे महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून या शहरामध्ये येणाऱ्यांची संख्या वाढत होती. एक प्रकारे मिनी महाराष्ट्र म्हणून पिंपरी चिंचवड शहराची ओळख होत असताना या शहराला विकासाचा नवा आयाम देण्याचे काम लक्ष्मणभाऊ जगताप यांच्या माध्यमातून झाले. पिंपरी चिंचवडमधील त्यांची कारकीर्द, त्यांचे विकासातील योगदान कोणीही विसरू शकत नाही. आमदार म्हणून शहराच्या विकासाच्या दृष्टीने ते कायम संघर्ष करत राहिले. अत्याधुनिक शहर म्हणून पिंपरी चिंचवडची ओळख होताना लक्ष्मणभाऊंचे योगदान कायम स्मरणात राहणार आहे. राज्य सरकार, पिंपरी चिंचवड महापालिका या दोघांचा मेळ घालत लक्ष्मणभाऊंनी या शहराला चेहरा देण्याचे काम केले. विकासाचे व्हिजन खऱ्या अर्थाने लक्ष्मणभाऊ जगताप यांनी शहरात रुजवले.

मुख्यमंत्री पुढे म्हणाले, लक्ष्मणभाऊ जगताप यांच्याकडे आध्यात्मिक बैठक होती. वारकरी संप्रदायाशी त्यांचे घट्ट नाते होते. मातीशी जोडलेली नाळ त्यांनी कधीच सोडली नाही. त्यामुळेच खऱ्या अर्थाने सामान्य माणसांच्या प्रश्नांची जाण त्यांना होती. उत्तम खेळाडू, सांघिक नेतृत्व या माध्यमातून त्यांचे काम होते. ते उत्तम घोडेस्वार होते. त्यामुळेच विकासाचा वेग त्यांनी कायम राखला. शहर विकासाच्या अत्याधुनिक कल्पना त्यांच्या ठायी वसलेल्या होत्या. त्यामुळेच आज या शहराचे पालटलेले रूप आपण पाहतो. कचऱ्यापासून वीज निर्मिती, 24 X 7 पाण्यासाठी अमृत योजना, नदी सुधार योजना अशा सर्व योजना चिरकाल लक्ष्मणभाऊंच्या कार्याची आठवण देत राहतील. लक्ष्मणभाऊ लढवय्ये होते. विपरीत परिस्थितीतही ते नेहमी विजयी होत होते. त्यांच्या उभ्या आयुष्यात कुठल्याही परीक्षेत त्यांचा पराजय झालेला आपण पाहिला नाही मात्र नियतीने त्यांना हरवले. ही पोकळी कधीही भरून निघणारी नाही असेही मुख्यमंत्री फडणवीस यावेळी म्हणाले.

# पुण्यात गुन्हेगारांना उमेदवारी दिल्याच्या आरोपावर अजित पवारांचे स्पष्टीकरण

**राष्ट्रवादी काँग्रेसने पुण्यात काही जागा गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या आरोपींना दिल्याचा आरोपांवर अजित पवारांनी स्पष्टीकरण दिले आहे.**

**पुणे | प्रतिनिधी**

राज्यात सध्या महानगरपालिका निवडणुकीची रणधुमाळी सुरू आहे. यादरम्यान पुणे शहरात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी त्यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातून गुन्हेगारांच्या कुटुंबातील एकूण चार सदस्यांना उमेदवारी दिल्याची सध्या राजकीय वर्तुळात चर्चा होत आहे. या चार पैकी तीन या महिला उमेदवार असून दोघी तर कारागृहातून निवडणूक लढविणार आहेत. दरम्यान आज अजित पवारांनी याबाबत त्यांची भूमिका स्पष्ट केली आहे.

नाना पेठेतील आयुष कोमकर खून प्रकरणातील आरोपी आणि सध्या तुरुंगात असलेल्या सोनाली आंदेकर आणि लक्ष्मी आंदेकर यांच्यासह कुख्यात गुंड गजानन मारणे याची पत्नी जयश्री मारणे यांनी पक्षाच्या अधिकृत 'एबी' फॉर्मसह उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. यावरुन अजित पवारांना टीकेचा सामना करावा लागत आहे.

पत्रकार परिषदेमध्ये उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादीचे अध्यक्ष अजित पवार यांना पुण्यामध्ये अनेक गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या उमेदवारांना तिकिटं दिल्याचं समोर आलं आहे. त्यावर प्रश्न विचारला असता ते म्हणाले की, असं काहीही नाही. आतापर्यंतच्या सर्व निवडणुकांमध्ये आमची आरपीआय खरात गटासोबत युती झालेली आहे. तशीच यावेळी देखील झाली आहे. त्यामुळे आम्ही काही जागा त्यांना सोडल्या आहेत. त्याबाबत मी वेगळी पत्रकार परिषद घेणार आहे.

त्यामुळे खरात गट म्हणजे मित्रपक्षांनी त्यांना दिलेल्या जागा कुणाला द्यायच्या हे त्यांच्या हातात असतं. त्यावर मी काहीही सांगू शकत नाही. पण आम्ही मात्र गुन्हेगारांना उमेदवारी दिलेली नाही. असं म्हणत अजित पवारांनी गुन्हेगार उमेदवारांवरून हात झटकले आहेत. तर दुसरीकडे यावर माध्यमांशी सचिन खरातांना विचारले असता ते म्हणाले की, यावर मी अजित पवारांशी बोलून सांगेन.

शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसबरोबर देखील आम्ही पुणे आणि पिंपरी-चिंचवडमध्ये जागा लढवत आहोत. शिवसेना (शिंदे) पक्षांच्या काही नेत्यांबरोबर देखील चर्चा केली आहे आणि आज त्यांच्याबरोबर बसून काही मार्ग निघतोय का हे पाहणार आहोत.



## अजित पवारांचे स्पष्टीकरण

**» उपमुख्यमंत्री अजित पवार यांना प्रश्न विचारण्यात आला असता म्हणाले की, "तुम्ही आजपर्यंतच्या सर्व निवडणुका आठवा. आमची रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया- सचिन खरात यांच्याबरोबर युती झालेली आहे. काही जागा आम्ही त्यांना सोडलेल्या आहेत. मी त्यासंदर्भात वेगळी पत्रकार परिषद घेणार आहे. आपल्या सगळ्यांना माझी कामाची पद्धत माहिती आहे. आम्ही ज्यांच्याबरोबर युती करतो, त्यांना काही जागा सोडल्यानंतर त्यांनी त्या जागा कुणाला द्याव्यात हा त्यांचा निर्णय आहे." असे अजित पवार म्हणाले. शेवटच्या क्षणापर्यंत एबी फॉर्मचे वाटप, उमेदवार नाकारले जाणे असे, गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते. त्यामुळे डबल एबी फॉर्म, नाराजी अशी गोष्टी घडल्या, असेही अजित पवार यावेळी म्हणाले.**

## शरद पवार यांच्या पक्षाबरोबर युती

**» पुणे आणि पिंपरी-चिंचवडमध्ये दोन्ही राष्ट्रवादी एकत्र लढणार याबद्दलही अजित पवारांनी महत्त्वाचे विधान यावेळी केले. अजित पवार म्हणाले की, आमची आरपीआय-सचिन खरात यांच्याबरोबर युती झाली आहे. तुतारी म्हणजे शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसबरोबर देखील आम्ही पुणे आणि पिंपरी-चिंचवडमध्ये जागा लढवत आहोत. शिवसेना (शिंदे) पक्षांच्या काही नेत्यांबरोबर देखील चर्चा केली आहे आणि आज त्यांच्याबरोबर बसून काही मार्ग निघतोय का हे पाहणार आहोत, असे अजित पवार म्हणाले. तसेच उर्वरित राज्यातील इतर भागांमध्ये स्थानिक सहकाऱ्यांना अधिकार दिले आहेत, असेही त्यांनी स्पष्ट केले.**

## सचिन खरात काय म्हणाले?

**» दरम्यान अजित पवारांनी गुन्हेगारांना त्यांच्या पक्षाकडून उमेदवारी देण्यात आली नसल्याचे स्पष्ट केले. यावेळी सचिन खरात यांच्या आरपीआय पक्षाकडे त्यांनी बोट दाखवले. याबद्दल सचिन खरात यांना प्रश्न विचारला असता, अजित पवारांशी चर्चा केल्यानंतर यावर सविस्तर बोलेन अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली .**

# महापालिका निवडणुकीत टपाली मतदानाचा नवा विक्रम; 30 हजार कर्मचाऱ्यांची नोंदणी

**9 हजार 'EVM' आणि जीपीएसची निगराणी; पालिकेच्या निवडणुकीसाठी हायटेक तयारी; आयुक्तांनी घेतला तयारीचा सविस्तर आढावा.**

**पुणे | प्रतिनिधी**

महापालिका निवडणुकीसाठी तब्बल ३० हजार कर्मचाऱ्यांनी टपाली मतपत्रिकांची मागणी नोंदविली आहे. त्यामुळे यंदा पुण्यात सर्वाधिक टपाली मतदान होणार आहे. पुणे, पिंपरी-चिंचवड महापालिकेसाठी या कर्मचाऱ्यांची निवडणूक कर्मचारी म्हणून नेमणूक झाली आहे. त्यानुसार, प्रशासनाने तयारी करण्याच्या सूचना पालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी दिल्या.

आयुक्तांनी निवडणूक तयारीचा आढावा घेतला. प्रशासनाने निवडणुकीसाठी केलेल्या तयारीची माहितीही आयुक्तांनी घेतली. अतिरिक्त महापालिका आयुक्त(विशेष) ओमप्रकाश दिवटे ,उपायुक्त निवडणूक प्रसाद काटकर यावेळी उपस्थित होते. निवडणूक कामकाजासाठी पालिकेने २४ समन्वय अधिकारी नेमले असून त्यांनी निवडणूक तयारीचे सादरीकरण केले.

पालिका निवडणुकीसाठी ९००० ईव्हीएम उपलब्ध झाले असून उर्वरित मशीन आयोगाच्या निर्देशानुसार प्राप्त होतील. सर्व ईव्हीएम वाहतूक वाहनांना जीपीएस यंत्रणा लावलेली असून पोलीस बंदोबस्तामध्ये वाहतूक करण्यात येत आहे. तसेच स्ट्रॉंग रूम अद्ययावत असून त्या ठिकाणी सीसीटीव्हीही कार्यान्वित केलेले आहेत.

तसेच, याचे प्रशिक्षणही कर्मचाऱ्यांना देण्यास सुरुवात केली आहे. वाहतूक व्यवस्थापन अंतर्गत आवश्यक अधिकारी व कर्मचाऱ्यांना १०५१ वाहने उपलब्ध केली आहेत. तसेच वाहतूक आराखडा नकाशासह तयार करण्याचे काम अंतिम टप्प्यात आह

आचारसंहितेची कार्यवाही सुरू असून त्यासाठी २४ तास पथके कार्यरत आहेत. या कक्षाकडे आचारसंहिता भंगाचा पहिला गुन्हा दाखल झाला आहे. सुमारे ८ हजार बोर्ड फ्लेक्स, बॅनर्स काढले आहेत. आतापर्यंत कक्षाकडे ५ तक्रारी आल्या असून त्यावर वेळेत कारवाई केल्याचे स्पष्ट करण्यात आले..




## आचारसंहिता भंग

**» राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार आचारसंहितेची कार्यवाही सुरू असून त्यासाठी २४ तास पथके कार्यरत आहेत. या कक्षाकडे आचारसंहिता भंगाचा पहिला गुन्हा दाखल झाला आहे. सुमारे ८ हजार बोर्ड फ्लेक्स, बॅनर्स काढले आहेत. आतापर्यंत कक्षाकडे ५ तक्रारी आल्या असून त्यावर वेळेत कारवाई केल्याचे स्पष्ट करण्यात आले. मतदानासाठी आवश्यक सर्व साहित्य छपाई करण्याची कार्यवाही सुरू असून ४०११ मतदान केंद्राकरिता ६५०० साहित्याचे किट तयार करण्याची कार्यवाही सुरू आहे.**

# रिंगरोडपाठोपाठ पुरंदर विमानतळासाठीही कर्ज

**पुरंदर येथील प्रस्तावित आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या भूसंपादनाच्या मोबदल्यापोटी सहा हजार कोटींचा निधी कर्ज स्वरूपात उभारण्यात येणार आहे.**

**पुणे | प्रतिनिधी**

पुरंदर येथील प्रस्तावित आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या भूसंपादनाच्या मोबदल्यापोटी आवश्यक असलेल्या सहा हजार कोटींचा निधी कर्ज स्वरूपात उभारण्यात येणार आहे. 'हुडको' या खासगी संस्थेकडून त्यासाठी वित्तीय साहाय्य घेतले जाणार असून, मंत्रिमंडळाच्या बैठकीत याबाबतचा प्रस्ताव मंजुरीसाठी ठेवण्यात येणार आहे.

पुरंदर येथील प्रस्तावित छत्रपती संभाजीराजे आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी सात गावांतील तीन हजार एकर जागेचे संपादन करण्यात येणार आहे. त्यापोटी द्याव्या लागणाऱ्या मोबदल्यासाठी सहा हजार कोटी रुपयांच्या निधीची आवश्यकता आहे. पुण्यासह पश्चिम महाराष्ट्रातील जिल्ह्यांसाठी नियोजित पुरंदर विमानतळ उपयुक्त ठरणार आहे. त्यामुळे विमानतळाच्या कामाला राज्य शासनाकडून प्राधान्य देण्यात आले आहे



या संदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत मुंबईत गेल्या काही दिवसांपूर्वी शेतकऱ्यांच्या मोबदल्याबाबत सकारात्मक चर्चा झाली. तसेच प्रतिएकर आठ कोटी रुपये, जमिनीचा ३५ टक्क्यांपर्यंत परतावा, तसेच विमानतळाच्या उभारणीत भागीदारीबरोबरच घरांसाठी अतिरिक्त चटई निर्देशांक क्षेत्र (एफएसआय) यांसारख्या काही प्रमुख महत्त्वाच्या मागण्या करण्यात आल्या होत्या. त्या मागण्यांची दखल घेऊन मुख्यमंत्र्यांनी भूसंपादन कायदा, तसेच महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळाच्या (एमआयडीसी) पुनर्वसनाच्या कायद्यानुसार मोबदला देण्याचे सूतोवाच केले आहे. मात्र, ही रक्कम नेमकी किती आहे, हे गुलदस्तात आहे

दरम्यान, प्रकल्पग्रस्तांचा दाखला देण्याबरोबर राज्यातील सर्व प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या हितासाठी महामंडळ स्थापन करण्यात येणार असून, पुरंदरमधील शेतकऱ्यांच्या मुलांना विमानतळात रोजगाराची हमी मिळावी यासाठी प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्यात येणार आहे.

पुरंदर विमानतळासाठी शेतकऱ्यांना प्रतिएकरी दर किती मिळणार हे अद्याप जाहीर झालेले नाही. मात्र, मोबदल्यापोटी सुमारे सहा हजार कोटी रुपयांची आवश्यकता लागणार आहे. मोबदल्याचा दर निश्चित करण्यापूर्वी सरकारला निधी उभारावा लागणार आहे. त्यामुळे हुडको या संस्थेकडून कर्ज घेण्याची चर्चा सुरू झाली आहे.

रस्ते विकास महामंडळाकडून साकारण्यात येणाऱ्या रिंगरोडसाठी हुडकोकडून कर्ज उभारणी करण्यात आली आहे. त्या पाठोपाठ आता पुरंदर विमानतळाच्या भूसंपादनासाठी हुडकोकडून कर्ज घेण्याची तयारी राज्य शासनाकडून सुरू करण्यात आली आहे. तसा प्रस्ताव मंत्रिमंडळाच्या बैठकीत ठेवण्यात आला आहे.

### प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्यात येणार

» दरम्यान, प्रकल्पग्रस्तांचा दाखला देण्याबरोबर राज्यातील सर्व प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या हितासाठी महामंडळ स्थापन करण्यात येणार असून, पुरंदरमधील शेतकऱ्यांच्या मुलांना विमानतळात रोजगाराची हमी मिळावी यासाठी प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्यात येणार आहे..

### प्रस्ताव मंत्रिमंडळाच्या बैठकीत

» रस्ते विकास महामंडळाकडून साकारण्यात येणाऱ्या रिंगरोडसाठी हुडकोकडूनच कर्ज उभारणी करण्यात आली आहे. त्या पाठोपाठ आता पुरंदर विमानतळाच्या भूसंपादनासाठी हुडकोकडून कर्ज घेण्याची तयारी राज्य शासनाकडून सुरू करण्यात आली आहे. तसा प्रस्ताव मंत्रिमंडळाच्या बैठकीत ठेवण्यात आला आहे.

### कर्ज घेण्याची चर्चा सुरू

» पुरंदर विमानतळासाठी शेतकऱ्यांना प्रतिएकरी दर किती मिळणार हे अद्याप जाहीर झालेले नाही. मात्र, मोबदल्यापोटी सुमारे सहा हजार कोटी रुपयांची आवश्यकता लागणार आहे. मोबदल्याचा दर निश्चित करण्यापूर्वी सरकारला निधी उभारावा लागणार आहे. त्यामुळे हुडको या संस्थेकडून कर्ज घेण्याची चर्चा सुरू झाली आहे.

# आता ज्येष्ठ नागरिकांना मिळणार हक्काचे 'विरंगुळा भवन'? वळसे पाटलांची मोठी घोषणा

**राज्यासह देशभरातून भाविक मोठ्या संख्येने भीमाशंकरात दाखल होत आहेत, परिणामी संपूर्ण परिसरात गर्दीचे चित्र दिसून येत आहे.**

**पुणे | प्रतिनिधी**

ज्येष्ठ नागरिकांनी आनंदी जीवन जगण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे. सकारात्मक विचार घेऊन कुटुंबासह गावाचा विकास करण्यासाठी ज्येष्ठ नागरिकांची भूमिका महत्त्वाची असते,असे मत माजी गृहमंत्री दिलीप वळसे पाटील यांनी व्यक्त केले.आंबेगाव तालुका ज्येष्ठ नागरिक समन्वय समिती व डी. जी. फाउंडेशनच्या वतीने आधारवड या स्मरणिकेचा प्रकाशन सोहळा मंचर येथे संपन्न झाला.



माजी खासदार व पुणे म्हाडाचे अध्यक्ष शिवाजीराव आढळराव पाटील कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. भीमाशंकर सहकारी साखर कारखान्याचे बाळासाहेब बेंडे,निलेश थोरात, नवनाथ हुले,संजय थोरात,राजश्री गांजाळे, सचिन भोर,अण्णासाहेब टेकाळे, चंद्रकांत महामुनी, हनुमंत कुंभार, एकनाथ वाळुंज, प्रकाश खोचेकर, देवराम नाबगे, यांच्या सह तालुक्यातील विविध संस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते.

ज्येष्ठ नागरिकांनी आनंदी जीवन जगण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे. सकारात्मक विचार घेऊन कुटुंबासह गावाचा विकास करण्यासाठी ज्येष्ठ नागरिकांची भूमिका महत्त्वाची असते,असे मत माजी गृहमंत्री दिलीप वळसे पाटील यांनी व्यक्त केले माजी गृहमंत्री दिलीप वळसे पाटील यांच्याकडे विरगुळाभवनांची मागणी अध्यक्ष दशरथ भालेराव यांनी केली.सभेमध्ये संजय थोरात, हनुमंत कुंभार यांची भाषणे झाली.ज्यांनी स्मरणिकेसाठी देणगी दिली. त्यांचा सत्कार करण्यात आला.आंबेगाव तालुका ज्येष्ठ नागरिक समन्वय समितीचे अध्यक्ष दशरथ भालेराव,उपाध्यक्ष ए.एफ. इनामदार, काशिनाथ वळसे पाटील, सोपानराव नवले,सखाराम भालेराव, सूर्यकांत थोरात,भास्कर लोंढे,मारुती भोर,दत्तात्रय राऊत इत्यादींनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रयत्न केले. सखाराम भालेराव यांनी प्रास्ताविक व संजय बोऱ्हाडे यांनी सूत्रसंचालन केले. सोपान हुले यांनी आभार मानले.

### ज्येष्ठ नागरिकांसाठी विरगुळा भवन

» माजी खासदार आढळराव पाटील,अण्णासाहेब टेकाळे यांनी भाषणामध्ये ज्येष्ठांच्या जीवनशैलीबद्दल विचार व्यक्त करून आनंददायी जीवन जगण्याचा सल्ला दिला.माजी गृहमंत्री वळसे पाटील यांनी ज्येष्ठ नागरिकांसाठी विरगुळा भवन देण्याचे आश्वासन दिले.फेस्कॉमचे उपाध्यक्ष ए.एफ.इनामदार यांनी समितीने तयार केलेल्या स्मरणिकेबद्दल व समन्वय समितीच्या कार्याबद्दल माहिती दिली.